# महाराष्ट्र शासन
## सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग

१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे ४११ ००१
दुरध्वनी क्रमांक ०२०-२६१२२७८३३ E-mail : jdhepune@gmail.com फॅक्स नंबर ०२०-२६०५१६३२

क्र. ससं/उशि/पुवि/परिपत्रक/२०१९ | 3408

प्रति, दि. २०/१२/२०१९

१. प्राचार्य,
सर्व अशासकीय कला,वाणिज्य,विज्ञान,विधी व
शारिरीक शिक्षण व अध्यापक महाविदयालये, पुणे
२. कुलसचिव,सावित्रीबाई फुले पुणे विदयापीठ, पुणे
३. कुलसचिव,डेक्कन कॉलेज, पुणे
४. कुलसचिव,गोखले इन्स्टिटयूट, पुणे
५. कुलसचिव,यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विदयापीठ, नाशिक

**विषय- शाळा,महाविदयालय तसेच विदयापीठातील विदयार्थीच्या सुरक्षेतेच्या उपाय योजनेसाठी तातडीने विशाखा समिती, POCSO, POSH समितीची स्थापना करुन कार्यान्वीत करणेबाबत**

संदर्भ - संचालनालयाचे पत्र क्र उशिसं/मवि-१/विदयार्थीनी सुरक्षा/२०१९/१६२९३ दि.१९/१२/२०१९

उपरोक्त विषयास अनुसरुन शासन निर्णय क्र.मकचौ-२०१३/प्रक्र.६३/मकक दि.१९/६/२०१४ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार कामाच्या ठिकाणी महिलांचा होणारा छळ, तक्रारी यांचे निवारण करण्यासाठी महिला तक्रार निवारण समिती गठीत करण्यात येऊन त्या अनुषंगीक आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत निर्देशीत केलेले आहे.

महिला कर्मचा-यांच्या लैगीक छळास प्रतिबंध, मनाई व निवारण करण्यासाठी प्रत्येक शासकीय/निमशासकीय कार्यालये, शैक्षणिक संस्था/महाविदयालये/विदयापीठे या कार्यालयात अंतर्गत महिला तक्रार निवारण समिती गठीत करण्याबाबत कळविण्यात आले होते.

महाराष्ट्र सार्वजनिक विदयापीठ अधिनियम २०१६ मधील प्रकरण ५ नियम क्र.७३ (१०) नुसार कामाच्या ठिकाणी महिलांचा लैगिक छळ (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम २०१३ च्य तरतुदीनुसार विदयापीठ आणि संलग्न महाविदयालये यातील अध्यापक, कर्मचारी, विदयार्थी यांच्या लैगिक छळास प्रतिबंध व लैगिक छळ, घटना यांच्याशी संबंधीत तक्रारींचे निवारण आणि लैगिक छळ करण्यात सहभागी असणा-यांना शिक्षा करणे यांकरिता यंत्रणा कार्यान्वीत करावी असे नमूद केले आहे.

सदय संवेदनशील परिस्थितीत प्रत्येक शासकीय/निमशासकीय कार्यालये, शैक्षणिक संस्था/महाविदयालये/विदयापीठांमध्ये अंतर्गत महिला तक्रार निवारण समिती गठीत करणे व सदर समितीकडे प्राप्त तक्रारींबाबत तातडीने पुढील कार्यवाही करण्याच्या सूचना आपणांस देण्यात येत आहेत.

संस्था/महाविदयालये/विदयापीठांमध्ये गठीत केलेली महिला तक्रार निवारण समितीची माहिती तसेच सदर समितीकडून करण्यात येत असलेल्या कार्यवाहीचा तिमाही अहवाल संबंधीत विभागातील जिल्हा माहिती व बाल कल्याण अधिकारी यांचेकडे वेळोवेळी सादर करणे अनिवार्य आहे. तसेच त्याची एक प्रत प्रस्तुत कार्यालयास देण्यात यावी.

(डॉ. मोहन खताळ)
सहसंचालक,उच्च शिक्षण,
पुणे विभाग, पुणे